मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.ठाणे-401101 दुरध्वनी क्रं.28192828
मालमत्ता व्यवस्थापन विभाग

25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"



जा.क्र. मनपा/मा.व्य.वि./निविदा/ 460 /2026-27 दि. 20/ 11 /2026

// शुध्दीपत्रक //

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- निविदा सुचना प्रसिध्दीबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका वृत्तपत्रात प्रसिध्द करावयाची निविदा सुचना सोबत जोडलेली असून सदर कामाचा अंदाजित खर्च रू.5,00,000/- च्या आत इतका आहे. सदर जाहिर सुचना हे पत्र मिळाल्यापासून दोन दिवसात वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत - निविदा सुचना

प्रत :- 1) ई-टेंडरींग कक्ष
2) सिस्टीम मॅनेजर (वेबसाईटवर प्रसिध्दीकरीता)

PC-1/2026-27/PK/निविदा-2/1

मिरा-भाईंदर महानगरपालिका

कार्यकारी अभियंता (मा.व्य.वि.) यांचे कार्यालय
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - 401 101
जा.नं. मनपा/मा.व्य.वि./ 460/2026-27
दि.20/ 11 /2026

// जाहिर निविदा सुचना क्र. 457//

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) उत्तन येथील मासळी / भाजी / फुल / मटन मार्केट मधील ओटले दैनंदिन संचलन, देखभाल करीता भाडेतत्वावर देणेकामी इच्छुक मासळी विक्रेते यांनी दि.01/12/2026 रोजी दुपारी 02:00 वाजेपर्यंत सदर निविदेचे अटीशर्तीसह मालमत्ता व्यवस्थापन विभागात उपलब्ध होतील.

सदर निविदा फॉर्म रू.1100/- जी.एस.टी. रू.198/- इसारा रक्कम रू.10,000/- रोखीने दि.01/12/2026 रोजी 02:00 वाजेपर्यंत भरून त्याची पावती निविदा सोबत जोडणे बंधनकारक आहे. सदर इच्छुक मासळी विक्रेत्यांचे सर्व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज बंद लिफाफ्यामध्ये दुसरा मजला, जुने प्रभाग कार्यालय, पोलीस स्टेशन लगत, भाईंदर (प.) मालमत्ता व्यवस्थापन विभाग येथे दि.02/121/2026 रोजी दु. 12:00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

सदरील निविदा शक्यतो त्याच दिवशी आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्यास उघडण्यात येईल.

अ.क्र.	मालमत्तेचे नाव	उपलब्ध ओटल्यांची संख्या	अनामत रक्कम
1	भाईंदर (प.) उत्तन रोड, उत्तन येथील मासळी / भाजी / फुल / मटन मार्केट मधील ओटले	70 ओटले	रू.10,000/-

मा. महासभा दि.13/08/2026 ठराव क्र. 59 अन्वये मार्केट / मंडईतील गाळे भाडयाने देणेबाबत प्रस्तावित धोरण ठरविण्यात आले आहे.

सदर निविदेबाबतची संपुर्ण माहिती महानगरपालिकेचे www.mbmc.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

1. भाजी मंडईतील गाळयाचे भाडे प्रतिमाह 6 X 4 फुटासाठी मासळी / भाजी / फुल विक्रेत्यासाठी रू.4,500/- मटन विक्रेत्यासाठी रू.6000/- अधिक 18% GST प्रतिवर्षी सदर भाड्यात 5% वाढ करणेत येईल. अथवा महापालिका वेळोवेळी त्या बाबत निर्णय घेईल.
2. भाजी मंडईतील गाळा 03 वर्षाच्या भाडेपट्टा कराराने देणेत येईल. पुढील मुदतवाढ देणेचे अधिकार महापालिकेने राखून ठेवलेले आहे.
3. ओटा फक्त भाजी, मासळी, फुल व्यवसायासाठी आहे. इतर कोणतेही व्यवसाय ओटयात करता येणार नाही. सदर ओटयात अर्जदार व त्यांचे कुंटुबीय यांनाच4 फक्त व्यवसाय करता येईल.
4. सदरचा ओटा महापालिकेच्या परवानगी शिवाय हस्तांतरण करता येणार नाही, वारसाच्या नावे ओटा हस्तांतरीत करण्यास महापालिकेची परवानगी घ्यावी लागेल.
5. मंडईची वेळ सकाळी 7:00 ते रात्री 10:00 वाजेपर्यंत राहील.
6. विक्रीचा माल फक्त देण्यात आलेल्या गाळयामध्ये ठेवावा अन्य मोकळ्या जागेचा वापर त्यासाठी करू नये.
7. सदर ओट्याची दुरुस्ती व निगा हे मंजूर आटेधारकाने स्वखर्चाने करावयाची आहे, मात्र सदर ओट्यात कोणत्याही प्रकारचा फेरबदल करावयाचा नाही. दुरुस्तीसाठी महानगरपालिकेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.
8. सदर ओट्यात स्पोटक किंवा ज्वालाग्राही सामान ठेवता येणार नाही.
9. विक्रीस ठेवलेल्या मालाचा निरुपयोगी भाग अगर कोणत्याही प्रकारची घाण मंडईमध्ये ठरविलेल्या जागीच टाकली पाहिजे, इतरत्र कोठेही ठेवता येणार नाही.

10. सदर ओट्याचा विक्रेता किंवा नोकर हा संसर्गजन्य रोगापासून मुक्त असला पाहिजे.
11. वेळोवेळी ओटेधारकांची अगर त्याचे सेवकांची शारिरीक तपासणी व विक्री करिता ठेवलेल्या मालाची तपासणी महापालिकेचे आरोग्य अधिकारी अगर महापालिकेने पाठविलेल्या अन्य अधिकारी यांना करण्याचा अधिकार राहील.
12. उपयोगात आणणेची मापे व काटे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेतली असली पाहिजेत.
13. कोणत्याही ओटेधारकाला गिऱ्हाईकांच्या आकर्षणाकरीता जोरजोराने ओरडण्यास मनाई आहे. तसेच कर्ण/ कर्कश ध्वनीचा व त्यासंबंधी साहित्याचा उपयोग करता येणार नाही, तसे केल्यास त्याला जागा रिकामी करावी लागेल.
14. सदर ओट्याची दिलेली मुदत संपताच ओटयाची मालकी महापालिकेची असेल. त्याबद्दल कोणताही हक्क व नुकसान भरपाई मागता येणार नाही.
15. ओटेधारकांनी ओटयाचे भाडे दर महिन्याच्या 10 तारखेच्या आत महापालिकेकडे आगाऊ भरले पाहिजे. दोन महिन्यापेक्षा जास्त कालावधीचे भाडे थकीत राहिल्यास महापालिका कोणतीही पूर्व सुचना न देता महापालिका ओटा ताब्यात घेईल.
16. अर्जदार संस्थेने जागेची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन प्रत्येकी जागेसाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा, सदर जागा जशी आहे तशी "As in where is" देण्यात येईल याची नोंद घ्यावी,
17. अर्जदाराने स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसीलदार कार्यालयाकडील) देणे बंधनकारक राहील.
18. मिरा भाईंदर शहरा बाहेरील अर्जदारास जागा देण्यात येणार नाही. तसेच खोटे कागदपत्र देऊन जागा घेतल्याचे निदर्शनास आल्यास जागा रिकामी करून गुन्हा दाखल करण्यात येईल.

अ) जे अर्जदार मासिक भाडे भरण्याचा पर्याय स्विकारतील अशा अर्जदार व्यक्ती संस्थांनी 11 महिन्याचे मासिक भाडे (डिमांड ड्राफ्ट /post dated cheque) द्वारे महानगरपालिकेस अदा करावे लागेल व सोबत अर्जदार / संस्थेचे ज्या बँकेत खाते असेल. (सध्या व्यवहार होत असलेले) त्या बँकेतील खाते क्रमांक व पासबुकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील,

ब) अर्जदार संस्थेने ज्या दिवसापासून जागा वापरण्याकरीता घेतली आहे त्या दिवसापासून भाडे भरणा करणे अर्जदार संस्थेस दोन महिन्यापेक्षा जास्त भाडे थकीत केल्यास मासिक भाड्यानुसार दरमहा 2% प्रमाणे व्याज आकारण्यात येईल.

क) अर्जदार संस्थेच्या त्या वर्षातील कामाचा आढावा घेऊन पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देणे अथवा भाडेकरार रद्द करणे बाबतचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल. महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदारास ती स्वतः करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.

19. महानगरपालिकेने बांधलेले मार्केट मधील गाळे व इमारत संचलन देखभाल व दुरुस्तीसाठी कंत्राटदार नेमून दयावयाचा असल्यास वरील धोरणानुसार भाडे व अटीशर्तीनुसार कंत्राटदार नेमण्यात यावा. सदर अधिकार स्थायी समिती यांना राहिल.
20. महापालिका मिळकतीमध्ये विदयुत व पाणी व्यवस्था नसल्यास अर्जदारास ती स्वतः करावी लागेल व त्याकरीता आवश्यक नाहरकत दाखला महापालिकेकडून देण्यात येईल.
21. जागा भाड्याने उपलब्ध करुन देणेकरीता प्राप्त अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे किंवा एखादया एकापेक्षा जास्त अर्ज केल्यास अशा संस्थेस किती जागा द्यावी याबाबतचे अधिकार मा. स्थायी समिती यांना राहतील.
22. अर्जदार हे यापूर्वी महानगरपालिकेचे थकबाकीदार असल्यास अश्या अर्जदारांचे अर्ज नाकारण्यात येतील व अर्जदारास अपात्र करण्यात येईल.

- **पात्रता निकष**

  1) अर्जदाराने स्थानिक वास्तव्याचा दाखला (तहसीलदार कार्यालयाकडील) देणे बंधनकारक राहील.

  2) अर्जदार / संस्था हे महानगरपालिकेचे कोणत्याही प्रकारचे थकबाकीदार नसावेत.

शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

ठिकाण : भाईंदर
दि.